# मॅन्युअल – 12

## कलम ४ (१) (ब) (xii)

## विनिहीत (वाटप केलेल्या) रकमेसह अर्थसहाय्यीत कार्यक्रमांच्या अंमलबजावणीची पध्दत

## बृहन्मुंबईतील विविध संस्थांना आवर्ती सहाय्यक अनुदान देण्याबाबत सुधारित नियम

(महानगरपालिका ठराव क्रमांक 857 दि. 30 नोव्हेंबर 1989, महानगरपालिका ठराव क्रमांक 901 दि. 13 डिसेंबर 1990, महानगरपालिका ठराव क्रमांक 1768 दि. 28 मार्च 1994, महानगरपालिका ठराव क्रमांक 1175 दि. 12 डिसेंबर 1994, महानगरपालिका ठराव क्रमांक 661 दि. 10 ऑक्टोबर 2003 आणि महानगरपालिका ठराव क्रमांक 1099 दि.17 मार्च 2011 या अन्वये )

1. शिर्षक :

या नियमांना बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सहाय्यक अनुदानाचे नियम असे संबोधण्यात येईल आणि हे नियम महानगरपालिकेची बंधनकारक आणि स्वेच्छाधीन कर्तव्ये पार पाडणा-या संस्थांना सहाय्यक अनुदान देण्यासाठी अनुसरण्यात येतील.

2. उद्दिष्टे :

बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये विहित केलेली बंधनकारक आणि स्वेच्छाधीन कर्तव्ये पार  पाडणा-या, विशेषत सार्वजनिक सुरक्षा, आरोग्य, सोयी पुरविणा-या संस्थांना / संघटनांना, उत्तेजन देण्याकरिता महानगरपालिका स्वेच्छाधिकारात सहाय्यक अनुदान खालील सूचनांनुसार मंजूर करु शकते.

3. अनुज्ञेयता  :

ज्या संघटना अथवा संस्था यांची उद्दिष्टे खाली नमूद केल्याप्रमाणे असतील त्यांचा या नियमांन्वये सहाय्यक अनुदान देण्यासाठी विचार करण्यात येईल.

(अ) गरीब कुटुंबातील मुलांना पूर्व प्राथमिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण (विना अनुदान)  देणे किंवा
*** त्यासाठी सहाय्य करणे.

(ब) रुग्णालये, दवाखाने, कुष्ठ रोग्यांसाठीची गृहे, वेडया व्यक्तींसाठीची उपचारगृहे यांच्याद्वारे वैद्यकीय कार्य करणे किंवा त्यासाठी सहाय्य करणे.

(क) निराश्रित महिलांच्या कल्याणार्थ, भिक्षेकरी गृहे, अनाथालये आणि सुटकागृहे यांसारख्या संस्था चालविणे व त्यांना सहाय्य करणे.

(ड) वस्तुसंग्रहालये, वाचनालये, ग्रंथालये, व्यावसायिक प्रशिक्षण, कला दालने, व्यायामशाळा, क्रिडा संघटना आणि भारतीय शास्त्रीय संगीत, नृत्य, नाटक आणि साहित्य यांसारखे उपक्रम राबविणा-या आणि त्यासाठी सहाय्य करणा-या संस्था.

4. सहाय्यक अनुदान  मिळण्यासाठी संघटना/संस्थांची पात्रता :

सहाय्यक अनुदान मागणा-या संघटना/संस्थांनी खालील बाबींची (निकषांची )पूर्तता केली पाहिजे.

एक) संबंधित संघटना अथवा संस्था मुंबई पब्लिक ट्रस्ट अधिनियम किंवा सोसायटीज रजिस्ट्रेशन अधिनियम अन्वये नोंदलेली असली पाहिजे.

दोन) संबधित संस्था नफ्यासाठी अथवा प्रवर्तक, पदाधिकारी किंवा संस्था चालविणा-या इतर व्यक्ती यांच्या वैयक्तिक फायद्यासाठी चालविली गेली नसली पाहिजे.

तीन) संस्थेने कोणतेही शुल्क न आकारता किंवा सर्वसामान्य नागरिकांना परवडेल असे  नाममात्र शुल्क आकारुन धर्मादाय तत्वावर सेवा पुरविल्या पाहिजेत.

चार) संबंधित संस्थेने तिचे उपक्रम बृहन्मुंबईच्या हद्दीमध्ये पार पाडले पाहिजेत.

पाच) एखाद्या धर्माच्या सेवेसाठी कार्य करणा-या अथवा त्याच अटीवर प्रवेश देणा-या किंवा विशिष्ट धर्ममत अथवा धर्माच्या

प्रसारासाठी आणि त्याबाबतीत धर्मांतरासाठी कार्य करणा-या कोणत्याही संघटनेला अथवा संस्थेला अनुदान दिले जाणार नाही.

5. सहाय्यक अनुदान देण्याची कार्यपध्दती आणि तत्वे :

(अ)* संघटना अथवा संस्थेला खालील प्रकरणी अनुदान मंजूर केले जाणार नाही.

एक) नियम 6 (एक) अ आणि ब च्या कक्षेत येणा-या एखाद्या संघटनेकडे अथवा संस्थेकडे मंजूर करावयाच्या अनुदानाच्या लगत अगोदरच्या वर्षामध्ये, सदर वर्षाच्या लगत पूर्वीच्या वर्षामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेने मंजूर केलेल्या सहाय्यक अनुदानाच्या रकमेच्या दुप्पट संचित वर्ताळा रक्कम शिल्लक असल्यास सदर संस्थेला अथवा संघटनेला अनुदान मंजूर केले जाणार नाही.

दोन) नियम 6 (एक) क च्या कक्षेत येणा-या एखाद्या संघटनेच्या अथवा संस्थेच्या, मंजूर करावयाच्या अनुदानाच्या लगत अगोदरच्या वर्षाच्या ताळेबंदामध्ये, सदर वर्षाच्या लगत पूर्वीच्या वर्षामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेने मंजूर केलेल्या सहाय्यक अनुदानाच्या रकमेपेक्षा जास्त संचित वर्ताळा रक्कम दर्शविली असल्यास सदर संस्थेला अथवा संघटनेला अनुदान मंजूर केले जाणार नाही.

* हा नियम ज्या संघटना/संस्थांना लगत पूर्वीच्या वर्षामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेने अनुदाने मंजूर केलेली नसतील त्यांच्या बाबतीत लागू होणार नाही.

(ब) संस्था किंवा संघटना योग्य प्रकारे किंवा आर्थिक काटकसर न करता उपक्रम पार पाडीत नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा ज्या उद्दिष्टांसाठी निधी देण्यात आलेला आहे त्या उद्दिष्टांसाठी त्याचा विनियोग केला नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा निधीचे योग्य प्रकारे नियोजन न केल्याचे आढळून आल्यास सदर संस्थेला अथवा संघटनेला अनुदान मंजूर केले जाणार नाही.

(क) महानगरपालिकेकडून अनुदान प्राप्त करणा-या संस्थेने किंवा अनुदानासाठी प्रथमच अर्ज करणा-या
** संस्थेने आपला अर्ज ज्या वर्षासाठी सहाय्यक अनुदान मागावयाचे आहे त्या वर्षाच्या 31 ऑगस्ट पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख लेखापालांच्या खात्याला विहित नमुन्यामध्ये सादर केला पाहिजे. सदर अर्जासोबत ज्या वर्षाकरिता सहाय्यक अनुदानाची मागणी केलेली आहे त्या वर्षाच्या लगत अगोदरच्या वर्षाची वार्षिक अहवालाची प्रत, लेखा परीक्षित ताळेबंद आणि जमा आणि खर्चाचे लेखे सादर केले पाहिजेत. तसेच त्यासोबत संस्थेच्या घटनेची प्रत आणि नोंदणी प्रमाणपत्र सादर केले पाहिजे. विहित नमुन्यामधील अर्ज रु. 80 (अधिक अनुज्ञेय वस्तु व सेवाकर) दरवर्षी होणाऱ्या 10% वाढीसापेक्ष एवढया किंमतीने प्रमुख लेखापालांच्या कार्यालयात प्रत्येक वर्षाच्या दि.1 एप्रिल ते 31 ऑगस्ट या कालावधीत कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेमध्ये उपलब्ध होतील.

(ड) ज्या संस्थांना अनुदान मंजूर करण्यात येईल त्यांनी खालील बाबींना मंजुरी दिली पाहिजे.

(अ) अनुदानाची रक्कम रु.25,000/- पेक्षा जास्त असल्यास संस्थेने आपल्या व्यवस्थापकीय
** मंडळावर महानगरपालिकेचे प्रतिनिधी म्हणून स्थानिक नगरसेवकांना आणि अनुदानाची रक्कम रु.1 लाखापेक्षा जास्त असल्यास 2 नगरसेवकांना नेमण्यास मान्यता दिली पाहिजे. जर एखाद्या संस्थेने तिच्या व्यवस्थापकीय मंडळावर महानगरपालिकेचा प्रतिनिधी घेण्यास नकार दिल्यास सदर संस्थेला सहाय्यक अनुदान दिले जाणार नाही.

(ब) सदर प्रतिनिधीला किंवा प्रतिनिधींना अथवा महानगरपालिका आयुक्तांनी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही महानगरपालिका अधिका-यास आवश्यकता भासेल तेव्हा संबंधित संस्थेने तिचे लेखे आणि दस्तऐवज यांची तपासणी करण्यास परवानगी दिली पाहिजे.

6. <u>रक्कम ठरविण्यासाठीचे नियम :</u>

**(एक) विविध प्रवर्गांच्या संस्थांसाठी सहाय्यक अनुदानाच्या आर्थिक मर्यादा खालीलप्रमाणे असतील.**

****

**(अ) (एक)** रुग्णालये, कुष्ठ रोग्यांसाठीची गृहे, वेडया व्यक्तींसाठीची उपचारगृहे, प्रसुतीगृहे यांच्या द्वारे वैद्यकीय सेवा पुरविणा-या तसेच भिक्षेकरी गृहे, अनाथालये, सुटका गृहे चालविणा-या संस्थांना एकूण अनुज्ञेय खर्चाच्या 30 टक्के परंतु जास्तीत जास्त रु. 1 लाख इतके अनुदान अनुज्ञेय होईल.

(दोन) दवाखान्यांच्या बाबतीत एकूण अनुज्ञेय खर्चाच्या 30 टक्के परंतु जास्तीत जास्त रु.75,000 इतके अनुदान अनुज्ञेय होईल. (या संस्थांनी उर्वरित 30 टक्के खर्च त्यांच्या स्वतच्या उत्पन्नामधून भागविणे अपेक्षित आहे).

(ब) (एक) पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक शिक्षण देणा-या संस्थांना जास्तीत जास्त रु.1,50,000/- इतके तर निराश्रितांसाठीचे आणि महिला कल्याणाचे उपक्रम पार पाडणा-या संस्थांना जास्तीत जास्त रु. 1 लाख इतके अनुदान प्राप्त होईल.

(दोन) वर (1) (ब) (एक) मध्ये विहित केलेल्या कमाल मर्यादेसापेक्ष या संस्थांना अनुज्ञेय खर्चाच्या 100 टक्के इतके अनुदान अनुज्ञेय होईल.

(क) (एक) वस्तुसंग्रहालये, वाचनालये, ग्रंथालये आणि कलादालने यांसारख्या संस्थांना एकूण अनुज्ञेय खर्चाच्या 30 टक्के परंतु जास्तीत जास्त रु. 75,000/- इतके अनुदान अनुज्ञेय होईल.

(दोन) व्यायाम शाळा आणि क्रिडा संघटना यांना एकूण अनुज्ञेय खर्चाच्या 25 टक्के परंतु जास्तीत जास्त रु.75,000/- इतके अनुदान अनुज्ञेय होईल.

(तीन) भारतीय शास्त्रीय संगीत, नृत्य, नाटक, साहित्य यांसारखे उपक्रम पार पाडणा-या सांस्कृतिक संस्था आणि व्यावसायिक प्रशिक्षण देणा-या संस्था यांना एकूण अनुज्ञेय खर्चाच्या 20 टक्के परंतु जास्तीत जास्त रु.75,000/- इतके अनुदान अनुज्ञेय होईल.

**(दोन)** सहाय्यक अनुदानाच्या प्रयोजनार्थ अनुज्ञेय खर्चामध्ये नियमित सेवांसाठी केलेला सर्व आस्थापना खर्च, भाडे आणि कर यांचा खर्च, नियमित सेवा पुरविण्यासाठी केलेला थेट खर्च आणि सेवांसाठी केलेला इतर थेट संकिर्ण खर्च यांचा अंतर्भाव असेल. वैधानिक निधी किंवा संस्थेच्या विशेष ठरावानुसार निर्माण करण्यात आलेला कोणताही निधी वगळता अन्य निधींना उत्पन्नामधून वर्ग करण्यात आलेली रक्कम या बाबतीतील खर्च व भांडवली कामांवरील खर्च अनुज्ञेय खर्च म्हणून समजण्यात येणार नाही. ज्या वर्षासाठी सहाय्यक अनुदानाची मागणी केलेली आहे त्या वर्षाच्या लगत आधीच्या वर्षामधील संस्थेचा अनुज्ञेय खर्च हा सहाय्यक अनुदानाचा आधार असेल.

**(तीन)** एक (अ), एक (ब) आणि एक (क) मध्ये विहित केलेल्या कमाल मर्यादेसापेक्ष संस्थेला अनुदान मंजूर करीत असताना

* (भांडवली प्राप्ती, महानगरपालिकेचे अनुदान आणि राज्य/केंद्र शासनाचे अनुदान वगळता) संस्थेचे उत्पन्न, लगत आधीच्या वर्षातील तूट/वर्ताळा आणि संचित वर्ताळा आणि तूट विचारात घेण्यात येईल.

**(चार)** ज्या संस्थेने केवळ एका किंवा काही थोडया विविध उपक्रमांसाठी अनुदान मिळण्यासाठी अर्ज केलेला असेल तिच्या

* बाबतीत ज्यासाठी अनुदान अनुज्ञेय आहे त्या उपक्रमाचा अनुज्ञेय खर्च परिगणित करण्यात येईल आणि लगत आधीच्या वर्षामध्ये महानगरपालिकेने मंजूर केलेल्या अनुदानाच्या रकमेपेक्षा संस्थेच्या एकत्रित लेख्यांमध्ये तिप्पटीपेक्षा जास्त संचित वर्ताळा असल्यास सदर संस्थेला अनुदान अनुज्ञेय होणार नाही आणि ज्या प्रकरणांमध्ये त्या विशिष्ट उपक्रमाच्या बाबतीत तूट असेल तसेच संचित तूट असेल किंवा लगत आधीच्या वर्षामध्ये महानगरपालिकेने मंजूर केलेल्या अनुदानाच्या रकमेच्या तिप्पटीपेक्षा जास्त नसलेला संचित वर्ताळा असेल तर वरील कार्यपध्दतीनुसार (नियम 6 (एक) (तीन) आणि 6 (चार) नुसार) ज्या विशिष्ट उपक्रमासाठी अनुदान मागितलेले आहे त्या उपक्रमाचा

संचित वर्तांळा/तूट विचारात घेऊन अनुदान मंजूर करण्यात येईल. या प्रयोजनार्थ त्या विशिष्ट उपक्रमाचे जमा आणि खर्चाचे लेखे आणि ताळेबंद तसेच संस्थेचे एकत्रित लेखे संस्थेने सादर करणे आवश्यक आहे.

(पाच) जी संस्था निरनिराळया उपक्रमांसाठी एकापेक्षा जास्त अर्ज करेल आणि जिचा एकच नोंदणीचा क्रमांक असेल तिच्या बाबतीत केवळ एकच अर्ज विचारात घेण्यात येईल.

(सहा) उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतुदींच्या अधीन राहून सहाय्यक अनुदान मंजूर करण्यात येईल. सहाय्यक अनुदान मंजूर

*** करण्यासाठी मर्यादित तरतूद उपलब्ध असल्यास प्राथमिक शिक्षण, वैद्यकिय सेवा यांसारखी महानगरपालिकेची बंधनकारक कर्तव्ये पार पाडणा-या संस्थेला इतर संस्थांपेक्षा प्राधान्य देण्यात येईल.

7. <u>तपासणी आणि अधिदान :</u>

*****

(अ) ज्या संस्थेला रु. 10,000/- पेक्षा जास्त अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे त्या संस्थेची महानगरपालिका आयुक्त तपासणी करतील आणि सदर संस्थेला त्या तपासणी अहवालाच्या आधारावर अनुदान देण्यात येईल.

(ब) संस्थेने मंजूर झालेल्या अनुदानाची महानगरपालिकेच्या मंजुरीच्या दिनांकापासून 1 वर्षाच्या आत दोन प्रतींमध्ये देयक आणि महानगरपालिकेच्या करनिर्धारण आणि संकलन खात्याने दिलेले कर भरणा प्रमाणपत्र सादर करुन प्रमुख लेखापाल खात्याकडे मागणी केली पाहिजे. विहित कालावधीमध्ये अनुदानाची मागणी केली नाही तर अनुदानाची रक्कम व्यपगत झाली आहे असे समजून संस्थेला अधिदान केले जाणार नाही.

8. * अनुज्ञेय रक्कम रु. 500/- पेक्षा कमी असली तरी देखील शहर, पश्चिम आणि पूर्व उपनगरांमधील विविध संस्थांना मंजूर करावयाची सहाय्यक अनुदानाची रक्कम रु.500/- पेक्षा कमी असणार नाही.

9. * सहाय्यक अनुदान समिती नियम 3 आणि 4 वगळता अपवादात्मक प्रकरणांमध्ये कारणे नमूद करुन वरील बाबी शिथिल करुन काही विशिष्ट संस्थांना अनुदान मंजूर करण्यासाठी महानगरपालिकेला शिफारस करु शकते. अशा प्रकारच्या एकूण शिफारशी 10 टक्के अर्थसंकल्पीय तरतुदी पर्यंत सीमित असल्या पाहिजेत.

---

*** महानगरपालिका ठराव क्रमांक 901 दि. 13 डिसेंबर 1990**

*** * महानगरपालिका ठराव क्रमांक 1768 दि. 28 मार्च 1994 या अन्वये अंतर्भूत**

***** महानगरपालिका ठराव क्रमांक 1175 दि. 12 डिसेंबर 1994**

****** महानगरपालिका ठराव क्रमांक 661 दि. 10 ऑक्टोबर 2003**

******* महानगरपालिका ठराव क्रमांक 1099 दि. 17 मार्च & 2011**

**महानगरपालिका ठराव क्र. 3 दि. 12.04.1990**

महानगरपालिका ठराव क्र.1768 दि. 28.03.1994

महानगरपालिका ठराव क्र. 661 दि. 10.10.2003 आणि

महानगरपालिका ठराव क्र.1099 दि. 17.03.2011.

**शारिरीक/मानसिकदृष्टया अधू असणा-या विद्यार्थ्यांना शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण देणा-या बृहन्मुंबईतील संस्थांना आवर्ती सहाय्यक अनुदान देण्यासंबंधीचे नियम :-**

1. <u>शिर्षक :</u>

या नियमांना बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सहाय्यक अनुदानाचे नियम असे संबोधण्यात येईल आणि ते अंध, मुक्या आणि बहि-या, मानसिक वाढ खुंटलेल्या तसेच अपंग व्यक्तिंना शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण देणा-या संस्थांना आवर्ती सहाय्यक अनुदान देण्यासाठी अनुसरण्यात येतील.

2. <u>उद्दिष्ट :</u>

अधू मुले आणि व्यक्तिंना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणा-या संस्था /संघटनांना उत्तेजन देणे, हे या अनुदानाचे उद्दिष्ट आहे.

3. <u>अनुज्ञेयता :</u>

ज्या संघटना किंवा संस्था यांची खालीलप्रमाणे उद्दिष्टे/हेतू आहेत त्यांना या नियमांन्वये सहाय्यक अनुदान देण्यासाठी विचारात घेण्यात येईल.

(अ) अठरा वर्षापर्यंतच्या अंध, मुक्या आणि बहि-या, मानसिकदृष्टया वाढ खुंटलेल्या आणि अपंग मुलांना औपचारिक तसेच अनौपचारिक शिक्षण देण्यासाठी शाळा चालविणा-या संस्था,

(ब) अठरा वर्षे ते पंचेचाळीस वर्षे या वयोगटातील अंध, मुक्या आणि बहि-या, मानसिकदृष्टया वाढ खुंटलेल्या तसेच अधू व्यक्तिंना व्यावसायिक प्रशिक्षण देणा-या संस्था.

4. <u>सहाय्यक अनुदान मिळण्यासाठी संघटना/संस्थेची पात्रता :</u>

(एक) सहाय्यक अनुदान मागणा-या संघटना/संस्थांनी खालील बाबींची पूर्तता केली पाहिजेः-

(अ) संबंधित संघटना/संस्था मुंबई पब्लीक ट्रस्ट अधिनियम किंवा सोसायटीज रजिस्ट्रेशन अधिनियम अन्वये नोंदणी झालेली असली पाहिजे.

(ब) संबंधित संघटना/संस्था नफा मिळविण्याकरिता किंवा प्रवर्तकांच्या, पदाधिका-यांच्या अथवा तिच्याशी संबंधित व्यक्तिंच्या वैयक्तिक फायद्यासाठी चालविता कामा नये.

(क) ज्यासाठी अनुदान मिळण्याची विनंती केली आहे ते प्रयोजन पार पाडण्यासाठी संस्थेकडे/संघटनेकडे पुरेशी आस्थापना आणि आर्थिक साधनस्त्रोत उपलब्ध असले पाहिजेत.

(ड) संस्थेने /संघटनेने राज्य किंवा केंद्र शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा जास्त शुल्क (फी) आकारता कामा नये.

(दोन) बृहन्मुंबईच्या हद्दीमध्ये उपक्रम राबविणा-या संस्थांचाच या अनुदानासाठी विचार करण्यात येईल.

(तीन) ज्या संघटनेचे सभासदत्व धर्म, जात, पंथ किंवा भाषा या आधारावरच देण्याचे बंधनकारक असेल आणि जी संस्था धार्मिक किंवा जातीय शिक्षण देत असेल अथवा अशा शिक्षणाचा प्रसार करीत असेल अशी संघटना/संस्था सहाय्यक अनुदान मिळण्यासाठी पात्र समजली जाणार नाही.

(चार) संस्थेला शिक्षण आणि/किंवा व्यावसायिक प्रशिक्षण, यथास्थिती देण्याकरिता राज्य/केंद्र शासनाने मान्यता दिलेली असली पाहिजे.

(पाच) उपक्रम योग्य प्रकारे पार न पाडणा-या आणि आर्थिक काटकसर न करणा-या, तसेच ज्या प्रयोजनासाठी अनुदान घेतलेले आहे त्या प्रयोजनार्थ त्याचा विनियोग केला जात नसेल किंवा त्या निधीचे (अनुदानाचे) योग्य प्रकारे व्यवस्थापन केले जात नसेल अशा संघटना/संस्थेला अनुदान दिले जाणार नाही.

**5. सहाय्यक अनुदान देण्यासाठीची कार्यपध्दती आणि तत्वे :**

(एक) * महानगरपालिकेकडून अनुदान घेणा-या संस्थेने किंवा अनुदानासाठी प्रथमत: अर्ज करणा-या संस्थेने आपला विहित नमुन्यातील अर्ज संबंधित वर्षाच्या 31 ऑगस्ट पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख लेखापाल खात्याकडे सादर केला पाहिजे. सदर अर्जासोबत ज्या वर्षासाठी अनुदानाची मागणी केलेली आहे त्या वर्षाच्या लगत अगोदरच्या वर्षाचा संस्थेचा वार्षिक अहवाल, लेखापरीक्षीत ताळेबंद आणि उत्पन्न आणि खर्चाचे लेखे यांच्या प्रती सादर केल्या पाहिजेत. तसेच त्यासोबत संस्थेची घटना व नोंदणी प्रमाणपत्राची प्रत व मागील वर्षासाठी राज्य/केंद्र शासनाने संस्थेला मंजूर केलेल्या अनुदानाचे तपशिलही सादर केले पाहिजेत.

विहित नमुन्यातील कोरे अर्ज प्रत्येक वर्षाच्या दि. 1 एप्रिल ते 31 ऑगस्ट या कालावधीत प्रमुख लेखापालांच्या कार्यालयात रु. 80/- ( अधिक अनुज्ञेय वस्तु व सेवाकर) दरवर्षी होणाऱ्या 10% वाढीसापेक्ष एवढया किंमतीने प्राप्त होतील.

(दोन) ज्या संस्थेसाठी अनुदानाची शिफारस करावयाची आहे, तिने खालील बाबींना मान्यता दिली पाहिजे.

(अ) अनुदानाची रक्कम रु.50,000/- पेक्षा जास्त परंतु रु.1,00,000/- पर्यंत असेल तर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षणाधिका-यांच्या एका प्रतिनिधीला आणि अनुदानाची रक्कम रु.1,00,000/- पेक्षा जास्त असल्यास दोन प्रतिनिधींना संस्थेने तिच्या व्यवस्थापकीय मंडळावर नेमले पाहिजे.

(तीन) उपरोक्त प्रतिनिधीला किंवा प्रतिनिधींना अथवा महानगरपालिका आयुक्तांनी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही महानगरपालिका अधिका-याला आवश्यकता भासेल तेव्हा, संस्थेने तिचे लेखे व दस्तऐवज तपासण्याची अनुमती दिली पाहिजे.

(चार) ज्या संस्थांना अथवा संघटनांना अनुदाने मंजूर करण्यात आलेली असतील त्यांच्या व्यवस्थापकीय मंडळावरील महानगरपालिकेच्या प्रतिनिधीने किंवा प्रतिनिधींनी, ज्या वर्षासाठी अनुदाने मंजूर करण्यात आलेली आहेत त्या वर्षभरातील संस्थेचे काम व प्रगती

या संबंधीचे आपले वार्षिक अहवाल शिक्षणाधिका-यांना / महानगरपालिकेला सादर केले पाहिजेत.

6. अनुदानाची रक्कम ठरविण्यासाठीचे नियम :

**

(एक) सहाय्यक अनुदानाची रक्कम ठरविण्यासाठी, शाळा आणि व्यावसायिक प्रशिक्षण देणारी केंद्रे यांच्या खालील खर्चांच्या बाबी विचारात घेण्यात येतील :-

1) भाडे

2) अंशकालिक आणि मानसेवी इ.सह् कर्मचा-यांचे प्रत्यक्ष वेतन अथवा शासनाने मान्यता दिलेली वेतनश्रेणी या
दोन्हीपैकी कमी असलेल्या वेतनांवरील खर्च

3) शैक्षणिक बाबींवरील खर्च

4) कर

5) संकीर्ण खर्च

(दोन) संस्थेने ज्या वर्षासाठी सहाय्यक अनुदान मागितलेले आहे त्या वर्षाच्या लगत आधीच्या वर्षाकरिता शासनाकडून खर्चाच्या ज्या बाबींसाठी अनुदान प्राप्त झालेले आहे त्या बाबी वगळून प्रत्येक उपक्रमासाठी अनुज्ञेय खर्चाच्या 21 टक्के परंतु जास्तीत जास्त रु.एक लाख इतके सहाय्यक अनुदान अनुज्ञेय होईल. परंतु त्यासाठी संस्थेने प्रत्येक उपक्रमासाठी स्वतंत्र अर्ज आणि प्रत्येक उपक्रमाचे प्राप्ती व खर्चाचे लेखे, ताळेबंद स्वतंत्रपणे सादर केले पाहिजेत.

7. तपासणी आणि अधिदान :

***

(अ) ज्या संस्थेला रु.10,000/- पेक्षा जास्त अनुदान मंजूर करण्यात येईल, त्या संस्थेची महानगरपालिका आयुक्तांनी प्राधिकृत केलेले महानगरपालिका अधिकारी तपासणी करतील आणि त्यांच्या तपासणीच्या अहवालाच्या आधारावर संस्थेला अनुदान देण्यात येईल.

(ब) संस्थेने/संघटनेने अर्ज केल्याच्या आणि आवश्यक माहिती सादर केल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत, महानगरपालिकेची मंजुरी गृहित धरुन, अनुज्ञेय अनुदानाची 50 टक्के रक्कम आगाऊ देण्यात येईल आणि पात्र (अनुज्ञेय) असल्यास अनुज्ञेय अनुदानाची उर्वरित रक्कम महानगरपालिकेच्या मंजुरी नंतर देण्यात येईल.

---

* महानगरपालिका ठराव क्र. 1768 दि. 28.3.1994

** महानगरपालिका ठराव क्र. 661 दि. 10.10.2003

*** महानगरपालिका ठराव क्र. 1099 दि. 17.03.2011.

(क) <u>अर्जांची छाननी</u>

सहाय्यक अनुदानाच्या दाव्यांची छाननी करीत असताना नियम आणि वेळोवेळी विहित करण्यात आलेले निकष यांच्या बरोबरीनेच खालील बाबींची पूर्तता करण्याची देखील दक्षता घेण्यात यावी.

(एक) प्राप्त झालेल्या अर्जांना क्रमांक देण्यात यावेत आणि ते प्रत्येक अर्जावर लिहावेत. सर्व अर्जांची अनुक्रमणिका तयार केली पाहिजे.

(दोन) संस्थेला पत्रे/स्मरणपत्रे पाठवून अर्जासोबत आवश्यक असलेली कागदपत्रे मागविण्यात यावीत.

(ड) <u>विवरणपत्रे आणि महानगरपालिका चिटणीसांना पाठवावयाचे मसुदा पत्र तयार करणे</u>

प्रमुख लेखापाल (वित्त)/प्रमुख लेखापाल (कोषागार) यांनी उत्पन्न, खर्च, महानगरपालिकेचे सहाय्यक अनुदान, तूट किंवा वर्ताळा, राखीव निधी इत्यादिंची तपशीलवार माहिती तसेच अनुदानाची शिफारस करण्याची अथवा ते नाकारण्याची कारणे नमूद करुन एकत्रित विवरणपत्र केले पाहिजे. प्रत्येक प्रकरणात द्यावयाच्या अनुदानासंबंधी आयुक्तांच्या आदेशांसाठी महानगरपालिका चिटणीसांना पाठवावयाचे मसुदा पत्र देखील आयुक्तांना सादर केले पाहिजे.

(इ) <u>अनुदानांना मंजुरी</u>

सहाय्यक अनुदान समिती आयुक्तांचे प्रस्ताव विचारात घेऊन तिच्या शिफारशी महानगरपालिकेला करील. सहाय्यक अनुदान समितीच्या शिफारशी महानगरपालिका स्विकारुन त्यामध्ये काही बदल करावयाचे असल्यास ते करुन त्यांना महानगरपालिका मंजुरी देईल. तदनंतर महानगरपालिका चिटणीस यांच्याकडून महानगरपालिकेने संबंधित संस्थेला मंजूर केलेली अनुदानाची रक्कम संस्था अथवा संघटना प्रमुखांना कळविण्यात येईल आणि त्यांना प्रमुख लेखापाल कार्यालयाकडे अनुदानाची मागणी करण्याची विनंती करतील.

(फ) <u>मागण्यांना (दाव्यांना) संमती</u>

(एक) एकदा सहाय्यक अनुदान मंजूर करण्यात आले की त्या बाबतीतील अधिदानाचे देयक तयार करुन ते प्रमुख लेखापालांच्या खात्याला सादर करणे ही अनुदानग्राही संस्थेची जबाबदारी असेल. म्हणून कोणत्याही प्रकरणी हे काम अनुदानग्राही संस्थेच्या वतीने मंजुरी प्राधिका-यांचे कार्यालय करणार नाही.

(दोन) देयक स्विकारण्यापूर्वी अनुदानाच्या बाबतीत लागू केलेली अट अनुदानग्राही संस्थेने कोणत्याही हरकतीशिवाय मान्य केलेली आहे, हे विशेषत्वाने पहाणे आवश्यक असले पाहिजे.

(तीन) खालील रकाने असलेली अनुदानाची नोंदवही परिरक्षित करण्यात येईल.

(अ) अनुक्रमांक/संकेतांक

(ब) अनुदान मंजुरीचा महानगरपालिका ठराव क्रमांक आणि दिनांक

(क) अनुदानाच्या बाबतीत लागू केलेल्या कोणत्याही अटी

(ड) मंजूर केलेली रक्कम

(इ) प्रमाणकाचे टॅब्युलेशन

(फ) देयक संमत केल्याचा प्रमाणक क्रमांक आणि दिनांक

(ग) संमत करणा-या अधिका-याची आद्याक्षरी स्वाक्षरी आणि दिनांक

(चार) सहाय्यक अनुदान मंजुरीचा आदेश निघाल्याबरोबर नोंदवहीतील रकाना क्रमांक (अ) ते (ड) येथे नोंदी घेण्यात याव्यात आणि संबंधित लेखा अधिका-यांनी त्या साक्षांकित कराव्यात.

(पाच) अनुदानाच्या बाबतीत लागू करण्यात आलेल्या अटी अनुदानग्राही संस्थेने कोणत्याही हरकतीशिवाय यथोचितरित्या स्विकारल्या आहेत हे पहाणे आणि कोणतेही अनुदानाचे देयक त्याशिवाय संमत केले गेले नाही याची दक्षता घेणे हे देयक संमत करणा-या लेखा अधिका-याचे कर्तव्य असेल. कोणतेही देयक त्याची अनुदान नोंदवहीमध्ये संबंधित मंजुरीसह नोंद घेतल्याखेरीज संमत केले जाऊ नये. तसेच प्रमाणक अधिदानासाठी संमत झाल्याबरोबर त्याची सॅप कार्यप्रणालीत नोंद घेण्यात यावी.

## 9.3 <u>तदर्थ अनुदाने :-</u>

तदर्थ सहाय्यक अनुदानाचे बहुतेक सर्व अर्ज महानगरपालिका आयुक्तांच्या मार्फत विधी समितीकडून प्राप्त होतात आणि/किंवा महानगरपालिका आयुक्तांकडून थेट प्राप्त होतात, तर महानगरपालिका आयुक्तांच्या स्वेच्छाधीन अनुदानांमधून द्यावयाच्या अनुदानांसाठी बहुतांशी महानगरपालिका आयुक्तांकडून अर्ज प्राप्त होतात. या अर्जांची खालील कार्यपध्दतींचे अनुसरण करुन छाननी करण्यात यावी.

(एक) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये आपले उपक्रम पार पाडणा-या संस्थांना तदर्थ अनुदान अनुज्ञेय होते. तथापि पात्र प्रकरणांमध्ये मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 118 अ अन्वये महानगरपालिकेच्या मंजुरीने बृहन्मुंबईच्या हद्दी बाहेरील उपक्रमांसाठी देखील अनुदान दिले जाऊ शकते.

(दोन) संस्थेच्या स्थापनेची तारीख, मागील तीन वर्षांचे लेखापरीक्षीत लेखे, योजनेचे आराखडे आणि अंदाजित खर्च, योजनेचे उद्दिष्ट आणि संस्थेचे उपक्रम इत्यादी माहिती याबाबतीत संबंधित संस्थेकडून मागविण्यात यावी.

(तीन) **विविध संस्थांना तदर्थ अनुदानाचे अधिदान करण्यासाठी महानगरपालिकेने मान्यता दिलेली अनुसरावयाची मार्गदर्शक तत्वे खालीलप्रमाणे आहेत.** (महानगरपालिका ठराव क्रमांक 1132 दि. 10.8.1972 व महानगरपालिका ठराव क्र. 1809 दि. 29.3.1993 )

(अ) संबंधित संस्थांकडून प्राप्त झालेला अनुदानासाठीचा प्रत्येक अर्ज विधी समितीपुढे विचारार्थ सादर करण्याची सध्याची कार्यपध्दती चालू ठेवण्यात आली आहे.

(ब) प्रत्येक संस्थेला तिच्या प्रकल्प खर्चाच्या 25 टक्के एवढे परंतु जास्तीत जास्त रु.3 लाख अनुरुप भांडवली तदर्थ अनुदान किंवा तदर्थ अनुदान देण्याची शिफारस करण्यात यावी आणि ज्या प्रकल्पासाठी किंवा इमारतीच्या बांधकामासाठी सदर अनुदान मंजूर करण्यात

आले असेल त्या बांधकामाची किंवा प्रकल्पाची प्रगती लक्षात घेऊन सदरचे अनुदान हस्यांमध्ये देण्यात यावे.

(क) पाच वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त काळ कार्यरत असणा-या संस्थाच केवळ तदर्थ भांडवली अनुदान मिळण्यासाठी पात्र समजण्यात येतील.

(ड) वर्षभराच्या कालावधीमध्ये मंजूर करण्यात येणारे एकूण भांडवली सहाय्यक अनुदान केवळ रु. 20 ते 30 लाखांपर्यंतच सीमित असले पाहिजे.

(इ) माध्यमिक आणि उच्च शिक्षण देणे ही महानगरपालिकेची जबाबदारी नसून ती राज्य शासनाची जबाबदारी असल्याने या कारणासाठी तदर्थ सहाय्यक अनुदान मिळण्याची विनंती विचारात घेतली जाणार नाही.

(फ) सोसायटी रजिस्ट्रेशन अधिनियम आणि/किंवा पब्लिक ट्रस्ट अधिनियम अन्वये नोंदणी न झालेल्या संस्थेला किंवा संघटनेला अनुदान मंजूर केले जाणार नाही.

संबंधित संस्था महानगरपालिकेची बंधनकारक आणि स्वेच्छाधीन कर्तव्ये यांच्याशी सुसंगत अशी कर्तव्ये पार पाडीत आहे किंवा कसे किंवा सदर संस्था धर्मादाय आहे किंवा कसे तसेच ज्या कारणासाठी अनुदानाची मागणी केलेली आहे ते कारण मार्गदर्शक तत्वे इत्यादींच्या कक्षेत येते किंवा कसे आणि आर्थिक स्थिती इत्यादी बाबी विचारात घेऊन प्रस्तावांची छाननी करण्यात यावी.

(चार) जास्तीत जास्त रु. 3 लाख एवढे तदर्थ अनुदान अनुज्ञेय आहे. अर्थसंकल्पीय तरतुदींच्या अधीन राहून अनुदानास पात्र असलेल्या सर्व संस्थांना तदर्थ अनुदानाचा फायदा मिळेल याची दक्षता घेण्यात यावी.

(पाच) मार्गदर्शक तत्वांनुसार सर्व बाबींची पूर्तता झाल्यानंतर अनुदानाच्या शिफारशींना महानगरपालिका आयुक्त यांची मान्यता प्राप्त करण्यासाठी टिप्पणी सादर करण्यात यावी. महानगरपालिका आयुक्त यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर तदर्थ अनुदाने देण्यासाठी महानगरपालिकेची मंजुरी मागण्याकरिता महानगरपालिका चिटणीसांना पाठवावयाचे मराठी मसुदा पत्र विधी समिती मार्फत सादर करण्यात यावे. तदनंतर कागदपत्रे महानगरपालिकेची मंजुरी प्राप्त होईपर्यंत प्रलंबित ठेवण्यात यावीत.

(सहा) तदर्थ अनुदान देण्यासाठी महानगरपालिकेची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर त्याबाबतीतील नोंद मंजुरी नोंदवहीमध्ये घेण्यात यावी आणि संस्थेच्या वास्तुशास्त्रज्ञांनी यथोचितरित्या प्रमाणित केलेले बांधकामाच्या प्रगतीचे प्रमाणपत्र मागविण्यासाठी संस्थेला पत्र पाठविण्यात यावे. कारण बांधकामाच्या प्रगतीनुसार हस्यांमध्ये तदर्थ अनुदानाचे अधिदान करावयाचे असते.

(सात) तदर्थ अनुदानासाठी मार्गदर्शक तत्वांच्या कक्षेत न बसणारे संस्थांकडून प्राप्त झालेले अर्ज विधी समितीला सादर करण्यात यावेत आणि विधी समितीच्या मान्यतेने त्या बाबतीतील महानगरपालिकेची असमर्थता संबंधित संस्थेला कळविण्यात यावी.

(आठ) संस्थेकडून वास्तुशास्त्रज्ञांच्या प्रमाणपत्रासह पत्र प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पाचे आराखडे, अंदाज आणि मंजुरीची संपूर्ण कागदपत्रे कामाच्या जागेची प्रत्यक्ष तपासणी करण्यासाठी आणि पूर्ण झालेल्या बांधकामाचे मूल्यमापन करण्याकरिता प्रमुख अभियंता इमारत परिरक्षण आणि आरोग्य पायभूत सुविधा कक्ष (आ.पा.सु.क) यांना पाठविण्यात यावीत.

(नऊ) प्रमुख अभियंता इमारत परिरक्षण आणि आरोग्य पायभूत सुविधा कक्ष (आ.पा.सु.क) यांच्या अभिप्रायांच्या आधारावर तदर्थ अनुदानाच्या हस्याचे अधिदान करण्यासाठी आदेश प्राप्त करण्याकरिता प्रमुख लेखापालांना एक टिप्पणी सादर

करण्यात यावी. प्रकल्पाचा एकूण अंदाजित खर्च, पूर्ण झालेल्या कामाचा खर्च आणि तदर्थ अनुदानाची मंजूर करण्यात आलेली रक्कम या बाबी योग्यरित्या लक्षात घेऊन अनुदानाचे हप्ते देण्यात यावेत. प्रमुख लेखापालांचे आदेश प्राप्त झाल्यानंतर अर्थसंकल्पामधील योग्य त्या लेखाशीर्षाखाली रक्कम खर्ची दाखवून संबंधित प्रमाणक तयार करण्यात यावे.

(दहा) प्रमाणक तयार करुन त्याची मंजुरी नोंदवहीमध्ये नोंद घेण्यात यावी आणि अधिदानासाठी प्रमाणक संमत (पास) झाल्याबरोबर त्याची नोंद सॅप कार्यप्रणालित घेण्यात यावी.

(अकरा) प्रत्येक प्रकरणात तदर्थ सहाय्यक अनुदानाचे हप्ते अधिदानीत करीत असताना हीच (सारखीच) कार्यपध्दती अनुसरण्यात यावी.

---------------------------------------------

# महापौर चषक क्रीडा स्पर्धाकरिता मार्गदर्शक नियमावली
## क्र.एमजीसी/एफ/७१६९ दि.२१.०३.२००९

मा.महापौर व मा.महानगरपालिका आयुक्त यांनी संयुक्तिकरीत्या परिपत्रक क्र.एमजीसी/एफ/७१६९ दि.२१.०३.२००९ अन्वये सुधारित नियमावली निश्चित केली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे महापौर चषक ह्या नावाने क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यासाठी बृहन्मुंबईतील मान्यताप्राप्त क्रीडा संघटनांना अनुदान दिले जाते.

**मुख्य हेतू**

१) खेळाडूंना चांगल्या दर्जाच्या स्पर्धांमध्ये भाग घेऊन आपले कौशल्य जनतेसमोर दाखविण्याची संधी प्राप्त व्हावी.

२) खेळाडूंमध्ये गुणवंत खेळाडू तयार करणे.

३) नवीन खेळाडूंना उच्च दर्जाच्या खेळाडूंकडून विशेष कौशल्य आत्मसात करण्यास प्रोत्साहन देणे.

४) सर्वसाधारण जनतेस या क्रीडा स्पर्धांचा आनंद उपभोगता यावा.

५) क्रीडा संस्थांचे पदाधिकारी / खेळाडू / पंच / अधिकारी ह्यांची समाजाला ओळख व्हावी.

**स्पर्धा कालावधी**

प्रत्येक वर्षी नोव्हेंबर ते मार्च ह्या कालावधीत स्पर्धा घेण्यात येतात.

**स्पर्धा आयोजन रोटेशन पद्धतीने केले जाते**

बृहन्मुंबईचे दोन जिल्ह्यात विभाजन झाल्यानंतर क्रीडा संघटनांचेही पूर्व उपनगरे / पश्चिम उपनगरे व शहर या प्रमाणे विभाजन झालेले आहे. त्यामुळे काही खेळांच्या तीन- तीन संघटना तयार झाल्यामुळे स्पर्धा आयोजन करण्यासाठी रोटेशन पद्धतीने स्पर्धा आयोजित करण्यात येते.

**महापौर चषक क्रीडा स्पर्धा सन २०१८-१९ करीता अनुदान सहाय्य**

महापौर चषक क्रीडा स्पर्धा सन २०१८-१९ करीता महानगरपालिका ठराव क्र. ४७७ दि. ४ मार्च २०२१ अन्वये मंजूर केलेल्या अनुदान सहाय्याच्या रकमा :-

| स्तर | अनुदानाची रक्कम (रु.) |
|---|---|
| आंतरराष्ट्रीय | १२,१०,०००/- (मंजूरी क्र.एमजीसी/ए/१८५९ दि.११.०२.२०१५) |
| राष्ट्रीय | २,९०,०००/- |
| विभागीय/जिल्हा | १,५०,०००/- |
| अपंग क्रिकेट (विशेष बाब) | ३,००,०००/- |

# <u>महापौर चषक क्रीडा स्पर्धाकरिता मार्गदर्शक सूत्रे</u>

**महानगरपालिका ठराव क्र. १५१० दि.२१.०३.१९८९ अन्वये मंजूर**

| | |
|---|---|
| (एक) | एकदा क्रीडा स्पर्धेचा (महोत्सवी) (पातळी) स्वरूप म्हणजे, स्थानिक, राज्य किंवा अखिल भारतीय, इत्यादी ठरले म्हणजे, संबंधित संघ व संस्थांशी पत्र व्यवहार करणे. संघाची निवड करणे, पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करणे, क्रीडास्पर्धेचे आयोजन, इत्यादी तांत्रिक बाबी संबंधित क्रीडा संघटनांनी पार पाडावयाच्या आहेत. |
| (दोन) | निवासस्थान, वाहतूक, मैदानांची सिद्धता, वैद्यकीय सुविधा, प्रसिद्धी इत्यादी बाबींची व्यवस्था संबंधित क्रीडा संघटनेने स्वखर्चाने करावयाची आहे. महानगरपालिकेच्या संबंधित खात्याकडून काही सहाय्य आवश्यक असल्यास, जेथे शक्य असेल तेथे ते देण्यात येईल. |
| (तीन) | संबंधित क्रीडा संघटनेने, अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक प्रपत्ररूपाने आगाऊ सादर करावयाचे आहे. |
| (चार) | क्रीडा प्रमुख आणि महानगरपालिकेचे वरिष्ठ पर्यवेक्षक, शारीरिक शिक्षण, यांनी अंदाजपत्रकाची छाननी केल्यानंतर महानगरपालिका आयुक्त हे कर्णधार समितीशी विचारविनिमय करून, जोडपत्र “अ” मध्ये नमूद केलेल्या अनुज्ञेय खर्चाच्या आधारावर अनुदानाची रक्कम ठरवतील आणि क्रीडास्पर्धांना (महोत्सव)प्रारंभ होण्यापूर्वी किमान दोन आठवडे अगोदर संबंधित क्रीडा संघटनेला, मंजूर केलेल्या अनुदानापैकी ८०% रकमेचे अधिदान करण्यात येईल. (ठराव क्र.१९०० दि.२५.०३.१९९६). |
| (पाच) | क्रीडा स्पर्धा (महोत्सव) समाप्त झाल्यापासून तीन महिन्याच्या आत महानगरपालिका ठराव क्र.६१९ दि.१०.०८.२०१५, लेखा परिक्षा केलेले लेखा विवरणपत्र महानगरपालिकेकडे सादर केले पाहिजे. या लेखा- विवरण पत्राची वरिष्ठ पर्यवेक्षक, शारीरिक शिक्षण आणि प्रमुख लेखापालांचे कार्यालय छाननी करील आणि त्यानंतर उर्वरित २०% अनुदान देण्यात येईल. |
| (सहा) | सर्व कार्यक्रमाचे, उदघाटनांचे व समारोपाचे अध्यक्षस्थान महापौर भूषवितील त्यांच्या अनुपस्थितीत, अध्यक्ष स्थायी समिती हे अध्यक्ष असतील. |
| (सात) | महानगरपालिका आयुक्तांशी विचारविनिमय करून महापौर हे, प्रमुख पाहुणे, विशेष निमंत्रित व्यक्ती ठरवतील. |
| (आठ) | निमंत्रण आणि प्रमाणपत्रांचा मसुदा जनसंपर्क अधिकारी आणि प्रमुख कार्यवाही यांनी संमत केला पाहिजे. |

| | |
|---|---|
| (नऊ) | निमंत्रण पत्रिकेवर अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, संबंधित जिल्हा क्रीडा संघटनेचे अध्यक्ष व कार्यवाह यांच्या सह्या असतील. |
| (दहा) | संबंधित क्रीडा संघटनेने निमंत्रणपत्रिका, प्रमाणपत्रे छापावयाची आहेत. |
| (अकरा) | महापौर, तसेच संबंधित क्रीडा संघटनेचे अध्यक्ष व कार्यवाह यांच्या सहीने प्रमाणपत्रे देण्यात येतील. |
| (बारा) | महानगरपालिकेचे नगरसेवक, खाते प्रमुख व वरिष्ठ अधिकारी यांना निमंत्रण पत्रिका पाठविण्याचे (वितरित करण्याचे) काम महानगरपालिका चिटणीसांचे कार्यालय करील. |
| (तेरा) | इतर संस्था आणि निमंत्रित व्यक्ती यांना संबंधित क्रीडा संघटना निमंत्रण पत्रिका पाठवतील. |
| (चौदा) | आयोजक समितीचे प्रमुख कार्यवाह, संबंधित क्रीडा संघटनेचे कार्यवाह, वरिष्ठ पर्यवेक्षक , शारीरिक शिक्षण, यांची संयुक्त समिती बक्षिसे, पदके ठरवतील, मात्र, या बक्षिसासाठी, पदकांकरीता, कर्णधार समितीची मान्यता घ्यावी लागेल. |
| (पंधरा) | जाहिरातीच्या प्रयोजनार्थ सदर क्रीडा स्पर्धा (महोत्सव) कोणी पुरस्कृत करीत असतील तर त्याबाबतीत महापौरांशी विचारविनिमय करून कर्णधार समिती निर्णय घेईल. |
| (सोळा) | क्रीडा स्पर्धा (महोत्सव) समाप्त झाल्यानंतर एक महिन्याच्या आत, संबंधित क्रीडा संघटनेने क्रीडा स्पर्धेचा अहवाल, अंतिम निकाल आणि निरीक्षकांच्या अहवालाची प्रत, आयोजक समितीला सादर केली पाहिजे. |
| (सतरा) | संस्थेच्या खात्यात ८०% अनुदानाची रक्कम जमा झाल्यापासून तीन महिन्याच्या आत स्पर्धा घेणे बंधनकारक असून ज्या संघटना विहीत वेळेत स्पर्धा आयोजन करणार नाहीत त्या संघटनांना उर्वरित २०% अनुदान अनुज्ञेय होणार नाही.(मंजूरी क्र.एमजीसी/एफ/५५९३ दि.०८.०२.२०१८) |

**<u>अनुज्ञेय खर्चाच्या बाबी :-</u>**

**महानगरपालिका ठराव क्र. १५१० दि.२१.०३.१९८९ अन्वये मंजूर**

| | |
|---|---|
| (१) | क्रीडा स्पर्धा (महोत्सव) फी |
| (२) | संघटनेच्या नियमानुसार सहभागी संस्थाना व पदाधिकाऱ्यांना वाहन भत्ता |
| (३) | सहभागी संघ व पदाधिकाऱ्यांना दैनिक भत्ता (प्रतिव्यक्ती कमाल अनुज्ञेय रक्कम रु.१००/-) (ठराव क्र.१४११ दि.२६.०२.२०१४) |
| (४) | वाहतूक – आकार |
| (५) | निवासस्थान – आकार |
| (६) | मुद्रण, लेखन सामुग्री, बिले इत्यादी |
| (७) | प्रसिद्धी तसेच बेनर्स इत्यादी |
| (८) | मैदान सिद्धता आणि मैदानाचे भाडे असल्यास |
| (९) | व्यासपीठ, सजावट, फर्निचर इत्यादीचे भाडे |
| (१०) | वीज पुरवठा, ध्वनीक्षेपक यांचा खर्च |
| (११) | उदघाटन  व समारोप सोहळा (कार्यक्रम) |
| (१२) | बक्षिसे, पदके |
| (१३) | टपाल खर्च व दुरध्वनी खर्च |
| (१४) | पाहुणे व स्वयंसेवक इत्यादीना अल्पोपहार |
| (१५) | कार्यकर्त्यांना मानधन |
| (१६) | छायाचित्र (फोटो) काढणे, व्हिडिओ शूटिंग करणे इत्यादी खर्च |
| (१७) | साधनसामुग्री |
| (१८) | कार्यकर्त्यांना वाहन भत्ता |
| (१९) | अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाच्या ५% किरकोळ खर्च |

| | |
|---|---|
| | **महापौर चषक क्रीडा स्पर्धेसाठी अनुदान सहाय्याकरिता संघटनेने सादर करावयाची आवश्यक माहिती व कागदपत्रे :-** |
| (एक) | महानगरपालिका आयुक्त यांच्या आदेश क्र.एमजीसी/एम/६८७९ दि.२३.०६.२०१४ व क्र.एमजीसी/एफ/५५९३ दि.०८.०२.२०१८ नुसार वरिष्ठ पर्यवेक्षक (शारीरिक अनुदेश) महापौर चषक स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व संस्थांकडून रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र प्राप्त करून घेतील व सदर संस्थांपैकी ज्या संस्था विहित कालावधीत हिशोब सादर करणार नाहीत त्या संस्थांविरुद्ध प्रतिज्ञापत्रानुसार पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल (मंजूरी क्र. एमजीसी/एम/६८७९ दि.२३.०६.२०१४ व क्र.एमजीसी/एफ/५५९३ दि.०८.०२.२०१८).<br>१.सदर संस्थेस महापौर चषक स्पर्धेत सहभागी होण्यास कायमस्वरुपी बंदी घालण्यात येईल.<br>२.सदर संस्थेस / संघटनेस उर्वरित २०% अनुदानाचे अधिदान करण्यात येणार नाही.<br>३.सदर संस्थेला / संघटनेला अधिदानीत केलेल्या ८०% अनुदानाच्या रक्कमेची वसूली करण्याचे कायदेशीर अधिकार महानगरपलिकेला आहेत.<br>४.त्याचप्रमाणे सदर संस्था / संघटनेवर कायदेशीर कार्यवाहीसाठी झालेला खर्च, संबंधित संस्था / संघटनेकडून वसूल करण्यात यावा. |
| (दोन) | महापौर चषक क्रीडा महोत्सवाच्या आयोजनासबंधीतील मार्गदर्शक सूत्रांच्या आधारे मार्गदर्शक तत्त्वानुसार क्रीडा महोत्सवात सहभाग घेणाऱ्या प्रत्येक संस्थेस, स्पर्धा आयोजन समितीने निश्चित केलेल्या अनुदानाच्या रकमेपैकी ८०% रकमेचे आगाऊ अधिदान महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजूरीने करण्यात येते.<br>**<u>८०% अनुदानासाठी संस्थांनी सादर करावयाची कागदपत्रे :-</u>**<br>१) संस्थेचे नोंदणीप्रमाणपत्र<br>२) महापौरांचे स्पर्धा मंजुरी पत्र<br>३) ८०% रक्कमेचे मागणीपत्र<br>४) स्पर्धेचे अंदाजपत्रक<br>५) बँकेचा ECS फॉम<br>६) रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र<br>७) सहभागी स्पर्धकांची माहिती<br>८) स्पर्धकांचे प्रमाणपत्र |
| (तीन) | स्पर्धा संपन्न झाल्यानंतर मार्गदर्शक सूत्रांच्या आधारे सगळया सहभागी संस्थांकडून अहवाल, संपूर्ण हिशोब प्राप्त झाल्यानंतर सहभागी संस्थांना स्पर्धा आयोजन समितीने शिफारस केलेल्या अनुदानाच्या एकूण रकमेस व सदर संस्थाना आगाऊ अधिदान करण्यात आलेल्या ८०% रकमेस कार्योत्तर मंजुरी व अधिदानित केलेल्या ८०% रकमेचे विहित कालावधीत हिशोब सादर केल्यानंतर संस्थाना उर्वरित २०% रकमेचे अधिदान करण्यासाठी विधी समिती/ महानगरपालिका यांची मंजुरी घेणे आवश्यक आहे. मंजुरी प्राप्त झाल्यानंतरच उर्वरित २०% अनुदानाच्या रकमेचे अधिदान करण्यात येते.<br><br>**<u>२०% अनुदानासाठी संस्थांनी सादर करावयाची कागदपत्रे :-</u>**<br>१) स्पर्धा पार पाडल्याबाबत अहवाल (आंतरराष्ट्रीय व जिल्हा स्तरावरील स्पर्धकांचा पुरावा)<br>२) २०% मागणीपत्र<br>३) संस्थेचे लेखा परीक्षित आय-व्यय पत्रक<br>४) लेखा परीक्षित लेखा खाते<br>५) स्पर्धेच्या खर्चाची प्रमाणके व देयके |

| | |
|---|---|
| | ६) स्पर्धेचे अंतिम निकाल व फोटो<br>७) बँक पासबुक<br>८) पावती पुस्तक<br>९) खर्चाची संक्षिप्त सूची<br>१०)मेडल्स, ट्रॉफी वितरणाचा तपशील |

<u>संघटनेने सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र :-</u>

<u>(रु.१००/- stamp paper)</u>

## <u>प्रतिज्ञा पत्र</u>

क्रीडा संस्था / संघटनेचे नाव......................................या संघटनेत मी श्री./श्रीमती........................अध्यक्ष/चिटणीस/खजिनदार या पदावर कार्यरत असून सदर संस्था/संघटनेचा नोंदणी क्र...................दिनांक....................नोंदणी पत्ता .....................असा आहे. सदर संस्था/संघटनेतील अध्यक्ष/चिटणीस/खजिनदार यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेने आयोजित केलेल्या

महापौर चषक क्रीडा स्पर्धा सन .....................साठी मंजूर केलेल्या अनुदानासंबंधी मी संस्थेच्या/संघटनेच्यावतीने व स्वत:च्या वतीने जबाबदारीपूर्वक पुढीलप्रमाणे प्रतिज्ञापत्राद्वारे हमी देत आहे. दिनांक.........................रोजी संस्थेच्या/संघटनेच्या उपरोक्त नमूद केलेल्या कार्यालयात झालेल्या सभेमध्ये संस्थेच्या / संघटनेच्या सदस्यांच्या वतीने महानगरपालिकेला लिखित प्रतिज्ञापत्र देण्याच्या संस्थेच्या ठराव क्र. ...........................दि.........................हा सर्वानुमते मंजूर करण्यात आला. सदर ठरावानुसार संस्थेच्या/संघटनेच्या वतीने अध्यक्ष/चिटणीस/खजिनदार यांना महानगरपालिकेला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचा अधिकार दिलेला आहे. सदर ठरावाची प्रत सोबत जोडत आहे.

मी, सदर संस्थेच्या/संघटनेच्यावतीने, अध्यक्ष/चिटणीस/खजिनदार या नात्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून महापौर चषक क्रीडा स्पर्धा सन …………… साठी मंजूर केलेल्या अनुदाना संबंधी पुढीलप्रमाणे जबाबदारीपूर्वक प्रतिज्ञापत्र सादर करीत आहे.

महापौर चषक क्रीडा स्पर्धाकरिता असलेल्या मार्गदर्शक सूत्रांनुसार क्रीडा महोत्सवात सहभागी होणाऱ्या क्रीडा संघटनेला मंजूर केलेल्या अनुदानापैकी ८०% रकमेचे आगाऊ आधिदान महानगरपालिकेकडून करण्यात येते. सदर मार्गदर्शक सूत्रांनुसार क्रीडा स्पर्धा समाप्त झाल्यापासून तीन महिन्याच्या आत क्रीडा संस्थांनी/ संघटनानी लेखा परीक्षा केलेले लेखा विवरणपत्र महानगरपालिकेकडे सादर करणे आवश्यक असून सदर हिशोब तपासल्यानंतर अनुज्ञेय असलेल्या उर्वरित २०% अनुदानाचे अधिदान संबंधित क्रीडा संस्थांना/ संघटनाना महानगरपालिकेकडून करण्यात येते.

................................................... या संघटनेस महापौर चषक क्रीडा स्पर्धा सन ......... साठी ............स्तरासाठी एकूण रु. .................... इतके अनुदान महानगरपालिकेकडून मंजूर करण्यात आले आहे. सदर संघटनेतर्फे महापौर चषक क्रीडा स्पर्धा सन ............. चे आयोजन दि. .............. ते ............... या कालावधीत घेणार असून सदर स्पर्धा दि. ......... रोजी समाप्त होणार आहे.

.......................... संघटनेला ............ स्तरासाठी अनुदान दिलेले आहे त्याच स्तरांवर स्पर्धा आयोजित करण्यात येईल. जर अनुदान दिलेल्या स्तराव्यतिरिक्त इतर निम्नस्तरावर स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्यास संघटनेला अधिदानीत केलेल्या ८०% अनुदानाच्या रकमेतून अतिरिक्त रक्कम महानगरपालिकेस परत करीन.

मी संस्थेच्या/ संघटनेच्या वतीने महापौर चषक क्रीडा स्पर्धा सन ......... करीता संस्थेच्या खात्यात ८०% अनुदान रकमेचे अधिदान जमा झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत स्पर्धा आयोजन

करण्याची, तसेच महापौर चषक क्रीडा स्पर्धेच्या नियमांनुसार स्पर्धा समाप्त झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत स्पर्धेचे हिशोब आवश्यक कागदपत्रांसहित बृहन्मुंबई महानगरपालिकेचे वरिष्ठ पर्यवेक्षक, शारीरिक अनुदेश यांचे कार्यालय गिल्डर टॅंक इमारत, ग्रँट रोड (पूर्व), मुंबई – ४०० ००७ यांच्याकडे सादर करेन अशी हमी देत आहे.

महापौर चषक क्रीडा स्पर्धा सन ...................... वर नमूद केलेल्या वेळेत आयोजित केली नाही तसेच स्पर्धा संपन्न झाल्यानंतर विहित वेळेत हिशोब सादर केले नाहीत, तर आमच्या संस्थेच्या / संघटनेच्या विरुद्ध कारवाई करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिकेला पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

१.आमच्या संस्थेस महापौर चषक स्पर्धेत सहभागी होण्यास कायमस्वरुपी बंदी करण्यात यावी.

२.आमच्या संस्थेस / संघटनेस उर्वरित २०% अनुदानाचे अधिदान देण्यात येऊ नये.

३.आमच्या संस्थेला / संघटनेला अधिदानीत केलेल्या ८०% अनुदानाच्या रकमेची वसूली करण्यासाठी कायदेशीर कारवाई करण्याचे अधिकार महानगरपलिकेला आहेत.

४.त्याचप्रमाणे आमच्या संस्था / संघटनेवर कायदेशीर कारवाईसाठी झालेला खर्च आमच्या संस्था / संघटनेकडून वसूल करण्यात यावा.

वरील नियम व अटींचे पालन आमची संस्था/ संघटना स्पर्धा आयोजन करताना पूर्णपणे करेल व स्पर्धेचे लेखा परीक्षण केलेले हिशोब विहित कालावधीत सादर करतील. तरी मुंबई चषक क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्याची संधी आम्हाला मिळावी.

सदर प्रतिज्ञापत्र हे संस्थेच्या व सदस्यांच्या वतीने, कोणत्याही दबावाला बळी न पडता मी स्वखुशीने संस्थेच्या हितासाठी नियमांचे / अटींचे उल्लंघन करणार नाही, जर नियमांचे / अटींचे उल्लंघन झाल्यास आमच्या संस्थेच्या / संघटनेच्या विरुद्ध कारवाई करण्यात यावी असे प्रतिज्ञापत्र आज दि.............. रोजी करीत आहे.

स्वाक्षरी

दिनांक : श्री.............................

अध्यक्ष/ चिटणीस/खजिनदार

ठिकाण : क्रीडा संस्थेचे / संघटनेचे नाव................

**माझ्या समक्ष**

सन २०१८-१९ महापौर चषक स्पर्धेसाठी अनुदान देण्यात आलेल्या संस्था महानगरपालिका ठराव क्र.४७७ दि,०४ मार्च २०२१ अन्वये मंजूर अनुदान

| अनु क्र. | स्तर | संस्था | एकूण (रु.) |
|---|---|---|---|
| १. | राष्ट्रीय | मुंबई उपनगर खो-खो संघटना | २,९००००/- |
| २. | राष्ट्रीय | मुंबई उपनगर जिल्हा मल्लखाब संघटना | २,९००००/- |
| ३. | राष्ट्रीय | बृहन्मुंबई जिल्हा जिम्नॅस्टिक्स संघटना | २,९००००/- |
| ४. | जिल्हा | ग्रेटर बॉम्बे बॉडी बिल्डर्स असोसिएशन | १,५००००/- |
| ५. | जिल्हा | ॲम्युच्युअर वेटलिफ्टिंग असोसिएशन सबर्बन मुंबई | १,५००००/- |
| ६. | जिल्हा | मुंबई उपनगर जिल्हा कॅरम संघटना | १,५००००/- |
| ७. | राष्ट्रीय (विशेष बाब) | मुंबई क्रिकेट असोसिएशन फॉर दी डिसेबल्ड | ३,००,०००/- |
| ८. | जिल्हा | स्पोर्टस ॲक्रोबॅटिक्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र | १,५००००/- |
| ९. | जिल्हा | बृहन्मुंबई योगा संघ | १,२००००/- |
| १०. | जिल्हा | सिकई असोसिएशन ऑफ मुंबई सबर्बन डिस्ट्रीक्ट | १,५००००/- |
| ११. | जिल्हा | मुंबई शुटिंगबॉल असोसिएशन | १,५००००/- |
| १२. | जिल्हा | मुंबई सबर्बन टग ऑफ वॉर असोसिएशन | १,५००००/- |
| १३. | जिल्हा | मुंबई उपनगर थ्रोबॉल असोसिएशन | १,५००००/- |
| १४. | जिल्हा | मुंबई उपनगर फेन्सिंग असोसिएशन | १,५००००/- |
| १५. | राष्ट्रीय | मुंबई आर्चेरी असोसिएशन | २,३२०००/- |
| १६. | जिल्हा | थांग-ता असोसिएशन मुंबई सबर्बन | १,५००००/- |
| १७. | जिल्हा | नेटबॉल असोसिएशन ऑफ मुंबई | १,५००००/- |
| १८. | जिल्हा | मुंबई सबर्बन डॉजबॉल असोसिएशन | १,५००००/- |
| १९. | जिल्हा | मुंबई सिटी डिस्ट्रीक्ट व्हॉलीबॉल असोसिएशन | १,५००००/- |
| २०. | जिल्हा | कुडो असोसिएशन महाराष्ट्र (KAM) | १,५००००/- |
| २१. | जिल्हा | तेंग सू डो असोसिएशन ऑफ मुंबई सबर्बन डिस्ट्रीक्ट | १,५००००/- |
| २२. | जिल्हा | ट्रेडिशनल रेसलिंग असोसिएशन ऑफ मुंबई सबर्बन डिस्ट्रिक्ट | १,५००००/- |
| २३. | जिल्हा | अश ते डो असोसिएशन ऑफ मुंबई सबर्बन डिस्ट्रीक्ट | १,५००००/- |
| २४. | जिल्हा | हाफकिडो असोसिएशन ऑफ मुंबई | १,५००००/- |
| २५. | जिल्हा | दि पॅरालिंपिक पावरलिफ्टींग असोसिएशन, मुंबई | १,५००००/- |
| २६. | जिल्हा | तायक्वांडो असोसिएशन मुंबई | १,२००००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २७. | जिल्हा | स्पोर्टस डान्स असोसिएशन ऑफ मुंबई सबर्बन डिस्ट्रीक्ट | १,५००००/- |
| २८. | जिल्हा | युनिफाइट असोसिएशन मुंबई सबर्बन | १,२००००/- |
| २९. | जिल्हा | उपनगर जिल्हा विटी-दांडू (गिल्ली-दांडा) असोसिएशन | १,२००००/- |
| ३०. | जिल्हा | बुडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र | १,५००००/- |
| ३१. | जिल्हा | मुंबई सबर्बन डिस्ट्रीक्ट सॉफ्टबॉल असोसिएशन | १,२००००/- |
| ३२. | जिल्हा | मिक्स मार्शल आर्ट्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र | १,२००००/- |
| ३३. | जिल्हा | चेस बॉक्सिंग असोसिएशन ऑफ मुंबई सबर्बन | १,२००००/- |
| | | एकूण | ५३,९२,०००/- |

कोविड-१९ च्या महामारीमुळे निर्माण झालेली परिस्थिती विचारात घेता स्थायी समितीचा क्र. ८१२ दि.२५/११/२०२० च्या ठरावा अन्वये प्राप्त मंजूरीनुसार सन २०१९-२० मध्ये महापौर चषक क्रिडा स्पर्धांचे आयोजन न करण्याबाबत, संबंधित संस्थांना कळविण्यात आले.

तसेच महापौर चषक क्रिडा स्पर्धा सन २०२०-२१ अंतर्गत कोणत्याही क्रिडा संस्थेला अनुदान मंजुर करण्यात व अधिदान करण्यात आलेले नाही.

तसेच महापौर चषक क्रिडा स्पर्धा सन २०२१-२२ अंतर्गत कोणत्याही क्रिडा संस्थेला अनुदान मंजूर करण्यात व अधिदान करण्यात आलेले नाही.

शासन आदेश क्र. एमसीओ -२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दि.३.३.२०२२ नुसार, आद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ६क (१) मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेची मुदत ७ मार्च २०२२ रोजी संपल्यामुळे, महापौर चषक क्रिडा स्पर्धा सन २०२२-२३ तसेच सन २०२३-२४ अंतर्गत कोणत्याही क्रिडा संस्थेला अनुदान मंजूर करण्यात व अधिदान करण्यात आलेले नाही.